राज्यातील तृतीयपंथीय कल्याणासाठी व त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळ स्थापन करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन निर्णय क्र.: तृतीय-२०१८/प्र.क्र.२६/सामासु

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक - १३ डिसेंबर, २०१८

**वाचा:** १) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र. तृतीय-२०१४/प्र.क्र.४९/का-९ दि. ६/९/२०१४

२) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र. तृतीय-२०१४/प्र.क्र.४९/का-९ दि. ३/१०/२०१७

३) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.सिआरसी-२०१४/प्र.क्र.९२/का-९ दि. १०/१/२०१८

**प्रस्तावना :** राज्यातील तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी व त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळ स्थापन करणेबाबतचा मुद्दा तिसऱ्या महिला धोरणामध्ये समाविष्ट आहे. तृतीयपंथीय/ट्रान्सजेंडर हा समाजातील एक दुर्लक्षित घटक असून, या घटकास समाजाकडून सापत्न व भेदभावाची वागणूक दिली जाते. नेहमीच भेदभाव, सापत्न वागणुकीमुळे समाजातील हा घटक विकास प्रक्रियेपासून दुर्लक्षित राहिलेला आहे. त्यामुळे या समाज घटकांचे शासनामार्फत मुलभूत अधिकारांचे संरक्षण करुन त्यांना विकासाची समान संधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

या समाज घटकांची सर्वांगीण उन्नती व्हावी व त्यांना समाजाच्या विकास प्रवाहात आणले जावे, याकरिता, तसेच या समाज घटकांच्या समस्या बहुतांश विभिन्न स्वरुपाच्या असल्यामुळे शासनाचे विविध विभाग व या क्षेत्रातील कार्यरत नामांकित व्यक्तीचे मिळून त्यांच्या विकासाकरिता तृतीयपंथीय कल्याण मंडळ रुपाने स्वतंत्र कल्याणकारी उपाययोजनात्मक यंत्रणा निर्माण करण्याची आवश्यकता आहे. ही बाब विचारात घेता दि. २८/८/२०१४ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये राज्यस्तरीय व विभागीय स्तरीय तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या अनुषंगाने महिला व बालविकास विभागाकडून दि. ६ सप्टेंबर, २०१४ च्या शासन निर्णयान्वये तृतीयपंथीय हक्काचे संरक्षण व कल्याण मंडळ स्थापन करण्यात आले होते. तथापि आता हा विषय दि. ३/१०/२०१७ च्या शासन निर्णयान्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे वर्ग करण्यात आल्यामुळे नव्याने तृतीयपंथीय यांचे संरक्षण व कल्याण मंडळ स्थापन करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय :** राज्यातील तृतीयपंथीय यांच्या कल्याणासाठी व त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने खालीलप्रमाणे राज्य स्तरावर व विभागीय स्तरावर राज्यातील तृतीयपंथीय हक्काचे संरक्षण आणि कल्याण मंडळ स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.



Scanned by CamScanner

Scanned with CamScanner

२) **मंडळाची उद्दीष्टे :**

- तृतीयपंथीय/ट्रान्सजेंडर यांना कायद्याने निश्चित अशी ओळख/स्थान मिळवून देणे व त्यासाठी शासनाच्या विविध विभागांकडे पाठपुरावा करणे.
- तृतीयपंथीयांना सामाजिक संरक्षण प्राप्त करुन देणे.
- तृतीयपंथीयांच्या मानवी हक्कांची पायमल्ली होवू नये यासाठी उपाययोजना करणे.
- तृतीयपंथीयांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देवून त्यांचा आर्थिक व सांस्कृतिक विकास घडवून आणणे.
- तृतीयपंथीयांच्या विकासासाठी त्यांना संघटीत करणेकरिता प्रयत्न करणे.
- तृतीयपंथीयांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेणे.

३) **महाराष्ट्र राज्य तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळाची संरचना :-**

| | |
|---|---|
| अध्यक्ष | मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन १ |
| सह अध्यक्ष | मा. राज्यमंत्री सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन २ |
| उपाध्यक्ष | सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन ३ |
| सह उपाध्यक्ष | तृतीयपंथीय समुदायातील विख्यात व्यक्ती (एक) ४ |
| सदस्य | विधानसभा सदस्य (एक) ५ |
| सदस्य | विधान परिषद सदस्य (एक) ६ |
| सदस्य (३) | विधी, वैद्यकीय आणि सामाजिक कार्य क्षेत्रातील प्रत्येकी एक व्यक्ती ७ |
| सदस्य (२) | तृतीयपंथीयांसाठी कार्य करणाऱ्या नामवंत संस्थांतील २ तृतीयपंथी व्यक्ती (त्यापैकी किमान एक व्यक्ती Trans Women असणे आवश्यक) ८ |
| सदस्य | राज्य शासनाच्या खालील मंत्रालयीन विभागाचे सह सचिव /उप सचिव दर्जाचे प्रत्येक एक अधिकारी / प्रतिनिधी ९ |

१. ग्राम विकास विभाग
२. नगर विकास विभाग
३. आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग
४. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
५. उच्च व तंत्र शिक्षण विभाग
६. कामगार विभाग
७. रोजगार व स्वयंरोजगार विभाग
८. वित्त विभाग
९. नियोजन विभाग
१०. विधी व न्याय विभाग
११. अन्न व नागरी पुरवठा
१२. गृह विभाग
१३. गृह निर्माण विभाग
१४. महसुल व वन विभाग

Scanned with CamScanner

सदस्य - महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

सदस्य व्यवस्थापकीय संचालक, डॉ. आंबेडकर समता प्रतिष्ठान, नागपूर

सदस्य संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स कंट्रोल सोसायटी

सदस्य (६) विभागीय तृतीयपंथीय हक्काचे संरक्षण आणि कल्याण मंडळाचे कार्यकारी अधिकारी (प्रत्येक विभागातील एक)

सदस्य सचिव आयुक्त, समाजकल्याण, पुणे हे या मंडळाचे सदस्य सचिव व समन्वयक असतील.

**४ ) विभागीय तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळाची संरचना**

अध्यक्ष - विभागीय आयुक्त (महसुल)

सह अध्यक्ष - तृतीयपंथी समुदायातील नामवंत व्यक्ती (एक)

सदस्य - विभागीय आयुक्तांनी निवडलेले राजकीय क्षेत्रातील दोन व्यक्ती

सदस्य - महाराष्ट्र शासनाच्या खालील विभागाच्या अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांनी नामनिर्देशित केलेले क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी

१. ग्राम विकास विभाग
२. नगर विकास विभाग
३. आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग
४. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
५. उच्च व तंत्र शिक्षण विभाग
६. कामगार विभाग
७. कौशल्य व उद्योगजकता विभाग
८. वित्त विभाग
९. नियोजन विभाग
१०. विधी व न्याय विभाग
११. अन्न व नागरी पुरवठा विभाग
१२. गृह विभाग
१३. गृहनिर्माण विभाग
१४. महसुल व वन विभाग

सदस्य - तृतीयपंथीयांसाठी कार्य करणाऱ्या नामवंत संस्थेमधील २ तृतीयपंथीय व्यक्ती (त्यापैकी किमान एक व्यक्ती Trans Women असणे आवश्यक)

सदस्य सचिव - प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग

**५) राज्य तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळाचे कार्य :**

- तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याणाचे नियामक परिषद असेल (महाराष्ट्र राज्यातील तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण आणि कल्याण कार्यक्रम ठरविणे, प्रोत्साहन देणे व देखरेख ठेवणेसाठी)

Scanned with CamScanner

- समन्वय विभाग ( सामाजिक न्याय विभाग) तथा इतर विभागाने पुरविलेल्या माहितीच्या आधारे तृतीयपंथीयांचे प्रश्न हाताळणे आणि तृतीयपंथीयांच्या हक्काचे संरक्षण आणि कल्याणाच्या दृष्टीने धोरण निश्चित करणे आणि योजना तयार करणे.
- शासनाच्या विविध योजनांचे सुलभीकरण करुन त्याचा लाभ लाभार्थ्यापर्यंत पोहचविणे.
- विभागीय मंडळाच्या निर्णयाने बाधित झालेल्या व अपीलात आलेली प्रकरणे निकाली काढ़णे व या संबंधी दिशानिर्देश तयार करणे.
- समन्वय विभागाद्वारे विभागीय मंडळाच्या कार्यावर देखरेख ठेवणे.
- देखरेख, जमाखर्च वाटणी, निधी उभारणी इत्यादी संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणे.
- लाभार्थ्यांची नोंदणी,ओळखपत्र आणि सर्व विभागांसाठी तृतीयपंथीयांचे हक्क व कल्याणासाठी दिशानिर्देश तयार करणे.
- तृतीयपंथीयांच्या कला, सांस्कृतिक व क्रीडा गुणांना प्रोत्साहन देणे. तसेच त्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी कला अकादमी स्थापन करणे.
- लाभार्थ्यांचे हक्क आणि कल्याणासाठी निधीचा योग्य विनियोग करणे.

**६) समन्वय विभागाचे कार्य खालील प्रमाणे असतील**

**समन्वय विभाग** : आयुक्त (समाज कल्याण ) यांनी नामनिर्देशित केलेले अधिकारी तथा तृतीयपंथीयांच्या प्रश्नांवर काम करीत असलेल्या अशासकीय संघटना हे समन्वयाचे खालील काम करतील.

- राज्य तृतीयपंथीयांचे हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळाने घेतलेले धोरणात्मक आणि इतर निर्णय विभागीय तृतीयपंथीय मंडळास कळविणे.
- विभागीय मंडळांना निधी वाटपाचे सुलभीकरण करणे.
- देखरेख ठेवण्यासाठीची अहवाल आणि विकासाचे समन्वय करुन विभागीय मंडळामध्ये एकसुत्रीपणा आहे याची खात्री करणे.
- समन्वय विभाग यासाठी वेबसाईट तयार करेल आणि राज्यातील माहिती या वेबसाईटवर प्रसारीत करण्यासाठी समन्वय करेल.
- दर तीन महिन्यानी राज्य आणि विभागीय मंडळाची बैठक आयोजित करेल. लाभार्थ्यांच्या उपयोगासाठी विविध योजनांचा लाभ लाभार्थ्यांना देण्यासाठी आणि तृतीयपंथीयांची जिल्हानिहाय जनगणना करण्यासाठी विभागीय मंडळाकडील तीन महिन्याची आणि वार्षिक माहिती एकत्रित करेल.
- मार्गदर्शक तत्वानुसार तृतीयपंथीय कार्यक्रम व योजनांची सुरळीत अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाच्या इतर विभागांशी व संघटनांशी समन्वय करेल.
- समन्वय विभाग, इतर विभाग तसेच तृतीयपंथीच्या प्रश्नावर काम करीत असलेल्या अशासकीय संघटनेच्या मदतीने विभागीय मंडळास/इतर कोणत्याही आवश्यक घटकांस प्रशिक्षण आणि तांत्रिक सल्ला देईल.
- मंडळाचे कामकाज सुलभ चालण्यासाठी अधिकारी/कर्मचारी यांची गरजेनुसार नेमणूक करणे त्यासाठी अधिकारी/कर्मचाऱ्याचा आकृतीबंध तयार करणे व शासनाकडून मंजूर करुन घेणे तसेच पद नियमितपणे तथा बाह्यस्तोत्रद्वारे विहीत पध्दतीने शासन मान्यतेने भरणे.

Scanned with CamScanner

**७) विभागीय तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळाचे कार्य :**

- तृतीयपंथीय लाभार्थी म्हणून नोंदणी करणे.
- तृतीयपंथीयाच्या शिक्षणासह आर्थिक सहाय्यासाठी सर्व स्तरावर मदत करणे व लाभार्थ्यांच्या पालकांना देखील शिक्षणासंदर्भात सहाय्य करणे, अशासकीय संस्थांच्या मदतीने कौटुंबिक सल्ला पुरविणे, अशा बालकांना कुटुंबांबाहेर सोडले जाऊ नये म्हणून समाजात जागृती निर्माण करणे, ज्या जिल्ह्यात आवश्यक असेल अशा ठिकाणी शिक्षक व अशासकीय संस्थाच्या मदतीने समुदेशन अनिवार्य करणे, लैंगिक ओळखीच्या आधारे शाळा व महाविद्यालयामध्ये अशा व्यक्तींना प्रवेश नाकरले जाणार नाहीत, यावर देखरेख ठेवणे, अशा प्रकारे तृतीयपंथीयांना प्रवेश नाकारल्यास अशा शाळा, महाविद्यालयाविरुध्द संबंधित प्राधिकरणामार्फत कार्यवाही करणे आणि शिक्षण व उच्च शिक्षण विभागांशी समन्वय साधून याबाबत आवश्यक ती परिपत्रके जारी करणे.
- तृतीयपंथीयांना गुन्हेगारीपासून परावृत्त करणाच्या दृष्टीने पोलीस विभागाला संवेदिन करणे आणि मंडळ वेळोवेळी ठरवेल असे इतर फायदे उपलब्ध करुन देणे.
- तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण होण्याच्या दृष्टीने विविध विभागांशी समन्वय साधून विविध योजनांचा लाभ मिळवून देणे.
- राज्य तृतीयपंथीय मंडळ आणि समन्वय विभाग नेमून देतील असे इतर कामकाज करणे.

**८) लाभार्थ्यांना खालीलप्रमाणे लाभ देण्यात यावा. (परंतु तो यापुरताच मर्यादित नसावा) (महाराष्ट्र राज्य तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळ तथा विभागीय तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळामार्फत)**

- लाभार्थ्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार व गरजेनुसार रोजगार मिळवण्यास सहाय्य करणे.
- लाभार्थ्यांच्या किंवा त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींचे आरोग्य विषयक वैद्यकीय खर्च, प्रतिबंधात्मक आणि उपचार.
- अपघात प्रसंगी लाभार्थ्यांना तात्काळ मदत.
- लाभार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार निवारा/वास्तव्याचा लाभ देण्यास सहाय्य.
- लाभार्थ्यांच्या निधन प्रसंगी त्यांच्या अंत्यविधीसाठी सहाय्य.
- प्रसारमाध्यमांद्वारे शल्यचिकित्सा आणि उपचाराबाबत जनजागृती.
- लघुउद्योगांची माहिती व प्रशिक्षणासह कौशल्य आणि नेतृत्व गुण विकासाच्या संधी उपलब्ध करुन देणे.

लाभार्थ्यांच्या सदर्भात महाराष्ट्र राज्य तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळ तथा समन्वय विभाग योजना तयार करेल, त्यासाठी निधीची तरतूद करेल, अंमलबजावणीसाठी यंत्रणा तयार करील तथा अंमलबजावणीवर नियंत्रण ठेवेल.

**९) सर्वसाधारण:-**

- राज्य आणि विभागीय तृतीयपंथी मंडळाच्या सदस्यांचा कार्यकाळ हा ३ वर्षाचा असेल. तथापि सदरील सदस्यांना हे नवीन सदस्यांची नियुक्ती होईपर्यंत अध्यक्षांच्या मान्यतेने कार्यभार सुरु ठेवता येईल.
- प्रत्येक सदस्यांना (शासनाचे प्रतिनिधीत्व करणारे सदस्य वगळुन) शासनाच्या प्रचलित नियमानुसार मंडळाच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी प्रवास व दैनिक भत्ता मंडळाच्या निधीमधून देण्यात येईल.
- राज्य आणि विभागीय तृतीयपंथीय मंडळाच्या बैठका आणि सर्व पुरक व सहाय्यभूत प्रकरणांसंदर्भात कार्यपध्दती प्रचलित नियमांप्रमाणेच असतील.



Scanned with CamScanner

- मंडळांसाठीचा मोबदला मंडळाच्या निधीमधून दिला जाईल आणि सेवांसाठीचे नियम व अटी शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे असतील.
- समन्वयन विभागाने ठरविलेल्या परिशिष्टानुसार समन्वय विभाग सर्व विभागीय मंडळाच्या कामांची तपासणी करुन राज्य तृतीयपंथीय मंडळास अहवाल सादर करेल.
- सदस्यत्वाचा राजीनामा : मंडळाचा कोणताही अशासकीय सदस्य त्यांच्या सदस्यत्वाचा राजीनामा लिखीत स्वरुपात मंडळाने सदस्य सचिव यांच्याकडे सादर करेल आणि सदरील राजीनाम्याचा स्विकार होताच त्या सदस्याचे सदस्यत्व संपुष्टात येईल.
- रिक्त पद लवकरात लवकर भरणे: मंडळाचे कोणतेही पद हे सदस्याचा मृत्यू, राजीनामा, अपात्रता किंवा काढून टाकणे किंवा इतर कारणास्तव रिक्त झाल्यास विभागीय मंडळाने त्वरीत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास कळवावे आणि रिक्त झालेले पद रिक्त झालेल्या दिनांकापासून ९० दिवसांच्या कालावधी पेक्षा जास्त नसेल या कालावधीत नवनियुक्तीद्वारे (पदनिर्देशाद्वारे) रिक्त झालेल्या पदाच्या ठिकाणी भरले जाईल व अशी नियुक्ती ही सदरील रिक्त झालेल्या व्यक्तीच्या कालावधी इतकाच कालावधी असेल.
- मंडळाचे इतिवृत्त हे चांगले व साधार गृहित धरणे : मंडळाचे कोणतेही कार्य किंवा इतिवृत्त केवळ सदस्यांचे पद रिक्त असल्या कारणामुळे गैर ठरविले जाणार नाही किंवा त्यासंबंधी प्रश्न उपस्थित केले जाणार नाहीत.

१०. <u>तृतीयपंथीय लाभार्थी म्हणून नोंदणीकरण:</u>

- प्रत्येक तृतीयपंथी नोंदणीसाठी पात्र असतील. सदर मंडळाकडे नोंदणी करण्यात आलेली तृतीयपंथी व्यक्ती हीच शासनाच्या तृतीयपंथीसाठी असणाऱ्या योजनांसाठी पात्र असेल.
- विहित नमुन्यातील अर्ज तृतीयपंथी विभागीय मंडळाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांकडे सादर करणे आवश्यक असेल.
- प्रत्येक अर्ज उपरोक्त दोन मुद्यांप्रमाणे मंडळाने ठरवून दिलेल्या दस्तऐवजांसह (प्रमाणपत्र) आणि वेळोवेळी ठरवून दिलेल्या विहित शुल्कासह सादर करणे आवश्यक असेल.
- मंडळाने प्राधिकृत केलेले अधिकारी उपरोक्त दोन मुद्यांप्रमाणे अर्जदारांची लाभार्थी म्हणून नोंदणी करेल अथवा लिखित स्वरुपात कारणांची नोंद घेऊन अर्ज फेटाळतील. परंतु अर्जदारांस त्यांचे म्हणणे मांडण्यास योग्य संधी दिल्याशिवाय अर्ज रद्द करण्यात येऊ नये.
- यास अनुसरुन दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती असा निर्णय मिळाल्यांच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत राज्य तृतीयपंथीयांच्या हक्काचे संरक्षण आणि कल्याण मंडळाचे सदस्य सचिव यांचेकडे अपील दाखल करुन शकेल. परंतु अपीलकारास अपील वेळेत दाखल करण्यास पुरेशा कारणामुळे प्रतिबंध झाला होता अशी सदस्य सचिवांची खात्री पटली तर सदस्य सचिव उक्त तीस दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर देखील अपील विचारात घेऊ शकेल.
- विभागीय मंडळाचे सदस्य सचिव विहित नमुन्यात अशी नोंदवही ठेवतील आणि समन्वय विभागास सादर करतील.

Scanned with CamScanner

- ओळखपत्र : विभागीय तृतीयपंथी मंडळ प्रत्येक नोंदणी करणाऱ्या तृतीयपंथ्याला ओळखपत्र देतील, त्या ओळखपत्रावर धारकांचे नाव, पत्ता, छायाचित्र आणि इतर आवश्यक माहिती असेल.

११) प्रस्तावित तृतीयपंथीय कल्याण मंडळास स्वायत्त दर्जा असणार असून त्यासाठी स्वतंत्र घटना व नियमावली असेल व त्याप्रमाणे कर्मचाऱ्यांच्या (सदरील कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा असणार नाही) नेमणूका करण्यात येतील.

१२) राज्यस्तरीय तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळाचे कार्यालय पुणे येथील भाडेतत्वावरील इमारतीमध्ये सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या कार्यालसाठी संगणक, फॅक्स, प्रिंटर, स्टेशनरी, फर्निचर इत्यादीची व्यवस्था उपलब्ध निधीमधून करण्यात यावा.

१३) सदर योजनेसाठी येणारा खर्च खालील नमूद लेखाशिर्षातंर्गत मंजूर तरतूदीतून भागविण्यात येईल.

| | |
|---|---|
| मागणी क्र.-३<br>२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण<br>०२-समाजकल्याण<br>१०६-सुधार सेवा<br>(०२)तृतियपंथीयांचे कल्याण<br>(०२)(०१)राज्यातील तृतियपंथीयांचे कल्याणासाठी व त्यांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी तृतियपंथीयांचे कल्याणमंडळ<br>(२२३५ सी १९९) | Grant No - 3<br>2235 - Social Security and Welfare<br>02 - Social Welfare<br>106 - Correctional Services<br>(02) - Welfare of Transgender<br>(02) (01) - Setting up Transgender Welfare Board for welfare of the Transgender and Protection of their right .<br>(2235 C 199) |

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अजय क.पवार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री/राज्यमंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई
शासनाचे सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.प्रधान सचिव, विधानसभा/विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, विधानमंडळ, मुंबई
मा. महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर
मा. महालेखापाल (लेखा वअनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर

Scanned with CamScanner

सर्व विभागीय आयुक्त (महसूल)
आयुक्त, समाजकल्याण, पुणे
जिल्हाधिकारी (सर्व)
सर्व प्रादेशिक उपायुक्त (समाजकल्याण विभाग)
सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती, सामासू

-----------

Scanned with CamScanner